**जिल्हापरिषदेच्या वर्ग ३- व वर्ग -४ च्या कर्मचाऱ्यांना आंतरजिल्हा बदलीने नेमणूक देण्याबाबत....**

**महाराष्ट्र शासन**
शासन परिपत्रक क्रमांक जिपब -०७११/प्र.क्र.११३/११/आस्था १४
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :-२९ सप्टेंबर, २०११.

वाचा: १) शासन परिपत्रक ग्राम विकास व जलसंधारण विभाग
क्र. जिपब७०६/ प्र.क्र.५०/आस्था-१४, दिनांक २० मार्च, २००७.
२) शासन शुध्दीपत्रक, ग्राम विकास व जलसंधारण विभाग
क्र. जिपब-७०६/ प्र.क्र.५०/आस्था-१४, दिनांक १ जून, २००७.
३) शासनशुध्दीपत्रक, ग्राम विकास व जलसंधारण विभाग
क्र.जिपब-७०६/ प्र.क्र.५०/आस्था-१४, दिनांक २१ जून, २००७.

**परिपत्रक**

शासनाच्या संदर्भाधीन परिपत्रकान्वये जिल्हा परिषद कर्मचा-यांच्या आंतरजिल्हा बदलीसाठी किमान १० वर्षे सेवा पूर्ण करण्याची अट घालण्यात आलेली आहे. तसेच अपवादात्मक परिस्थितीत सदर अट शिथिल करण्याबाबत शासन विचार करेल अशी तरतूद करण्यात आलेली आहे. तथापि त्यामुळे आंतरजिल्हा बदलीसाठी किमान १० वर्षे सेवेची अट शिथिल करण्यासाठी जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांचे अर्ज मोठया प्रमाणात शासनाकडे प्राप्त होऊ लागले आहेत. तसेच वर्ग ३ व वर्ग ४ च्या जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या आंतरजिल्हा बदलीसाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे सक्षम प्राधिकारी असताना सदर कर्मचाऱ्यांच्या बदल्याबाबत शासन स्तरावरुन मोठया प्रमाणात कार्यवाही करण्याची बाब विकेंद्रीकरणाच्या धोरणाशी विसंगत आहे. त्यामुळे जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या आंतरजिल्हा बदलीबाबतच्या धोरणांमध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

जिल्हा परिषदेच्या वर्ग ३ व वर्ग ४ च्या कर्मचाऱ्यांच्या आंतरजिल्हा बदलीबाबत शासनाची संदर्भाधीन परिपत्रके अधिक्रमित करुन (रद्द करुन), त्यासंदर्भात पुढीलप्रमाणे सुधारीत धोरण निश्चित करण्यात येत आहेः-

(१) महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७ मधील नियम ६(८) मधील तरतुदीनुसार जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांना आंतरजिल्हा बदलीने अन्य जिल्हा परिषदांमध्ये नेमणूक देण्यास संबंधित जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे सक्षम प्राधिकारी आहेत. तसेच संबंधित कर्मचाऱ्यास बदलीच्या ठिकाणी रुजू होण्यासाठी कार्यमुक्त करण्यासही ते सक्षम प्राधिकारी आहेत.

(२) अ) आंतरजिल्हा बदलीने एका जिल्हा परिषदेकडून दुसऱ्या जिल्हा परिषदेकडे जाऊ इच्छिणाऱ्या

कर्मचाऱ्याने प्रथमतः तो ज्या जिल्हा परिषदेतंर्गत कार्यरत आहे त्या जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे आंतरजिल्हा बदली मिळणेबाबत कारणासह विनंती अर्ज सादर करावा.

ब)सदर अर्जासोबत कर्मचाऱ्याने त्याची सेवा विषयक माहिती व आवश्यक ते संमतीपत्र जोडावेत.

क) तसेच अपवादात्मक परिस्थिती असल्यास सदर अर्जासोबत कर्मचाऱ्याने त्याबाबतची संबंधित कागदपत्रे पुराव्या दाखल जोडावीत.

(३) आंतरजिल्हा बदलीने नेमणूक दिल्यानंतर, पूर्वीच्या जिल्हा परिषदेत सदर कर्मचारी काम करीत असलेले पद रिक्त होते आणि सदर पद विहित पध्दतीनुसार भरण्यास बराचसा कालावधी लागतो व त्यामुळे सदर पद दिर्घकाळ रिक्त राहते, त्याचा जिल्हा परिषदेच्या कामावर विपरीत परिणाम होतो. म्हणून आंतरजिल्हा बदलीने करावयाच्या नेमणूकीची संख्या मर्यादित ठेवणे आवश्यक आहे. यास्तव एका जिल्हा परिषदेमध्ये सध्याच्या पदावर किमान ५ वर्षे सलग सेवा पूर्ण झालेल्या जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांचीच आंतरजिल्हा बदली करण्यात यावी.

तसेच सदर किमान ५ वर्ष सेवा कालावधीमध्ये सदर कर्मचा-याचा शिक्षणसेवक पदावरील कालावधी अंतर्भूत राहील.

(४) जिल्हा सेवेतील कोणत्याही पदावर नियमितरित्या नेमणूक देताना त्यांच्या नेमणूकीच्या आदेशामध्ये, नेमणूक झालेल्या पदावर किमान ५ वर्षे सेवा पूर्ण झाल्याशिवाय त्यांना अन्य जिल्हा परिषदेमध्ये आंतरजिल्हा बदलीने नेमणूक देण्यासाठी विचार करण्यात येणार नाही, अशी अट घालण्यात यावी आणि सदर अटीस तो कर्मचारी सहमत असल्याबाबत त्याच्याकडून लेखी लिहून घ्यावे. ही जबाबदारी सदर कर्मचाऱ्यास नियुक्ती देण्यात आलेल्या कार्यालयाच्या कार्यालय प्रमुखावर सोपविण्यात यावी व त्याचा उल्लेख नियुक्ती आदेशात करावा.

(५) आंतरजिल्हा बदलीसाठी कार्यरत जिल्हा परिषदांमध्ये किमान ५ वर्षे सेवा पूर्ण करण्याची अट आपसी आंतरजिल्हा बदलीसाठी सुध्दा लागू राहील.

(६) आंतरजिल्हा बदलीने नेमणूक देण्याची संधी जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांस त्याच्या सेवा कालावधीत फक्त एकदाच देण्यात यावी.

(७) प्रत्येक वर्षी दि.१ नोव्हेंबर ते दि.३१ डिसेंबर या कालावधीत आंतरजिल्हा बदलीसाठी अर्ज स्विकारण्यात यावेत. तसेच प्राप्त झालेले अर्जाची छाननी दि.१० जानेवारी पर्यंत पूर्ण करावी. अपूर्ण असलेले अथवा अपूर्तता असलेले अर्ज अर्जदारास परत करण्यासाठी दि.११ जानेवारी ते दि.१५ जानेवारी या कालावधीत एक दिवशीय विशेष शिबीराचे आयोजन करावे. कर्मचाऱ्याने अपूर्ततेची पूर्तता दि.३१ जानेवारी पर्यंत करावी. सदर कर्मचाऱ्यास तो सध्या कार्यरत असलेल्या जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची कार्यमुक्त करण्यास संमती असेल तरच जिल्हा परिषदेने परिपूर्ण अर्ज व त्या सोबत अर्जदाराने सादर केलेली कागदपत्रे व पुरावे तसेच कर्मचाऱ्यांचा सेवा विषयक तपशिल व आवश्यक कार्यालयीन कागदपत्रे दि.१० फेब्रुवारी पर्यंत अर्जदार कर्मचाऱ्यांनी आंतरजिल्हा बदलीने मागणी केलेल्या जिल्हा परिषदेकडे पाठवावे. सामावून घेणाऱ्या जिल्हा परिषदेने प्राप्त झालेले सर्व अर्ज दि.१५ मार्च पर्यंत तपासावेत व दि.३१ मार्च पर्यंत परिपूर्ण व स्वीकारार्ह असलेल्या अर्जाबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्वाक्षरीने संबंधित कार्यमुक्त करणाऱ्या जिल्हा परिषदेस त्यांची संमती कळवावी. सामावून घेण्यास संमती दिलेल्या कर्मचाऱ्यास त्यावेळेचा सविस्तर पदस्थापनेचा आदेश

देखील मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्वत:च्या स्वाक्षरीने संबंधित जिल्हा परिषदेस द्यावयाच्या संमतीपत्रासह जोडावा.

बदलीपात्र कर्मचाऱ्याच्या अपवादात्मक परिस्थितीत व त्या परिस्थितीची मुख्य कार्यकारी अधिकारी यांना खात्री पटल्यास ते सामावून घेणाऱ्या जिल्हा परिषदेकडे वर्षभरात केव्हाही शिफारस करण्यास सक्षम राहतील आणि सामावून घेणारे सक्षम प्राधिकारी त्या त्या संवर्गात व प्रवर्गात रिक्त पद असल्यास वर्षभरात केव्हाही सामावून घेऊ शकतील.

(अ) कार्यमुक्त करणाऱ्या जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आंतरजिल्हा बदलीने कार्यमुक्त करावयाच्या कर्मचाऱ्यास दि. ३० एप्रिल रोजी कार्यमुक्त करावे.

(ब) प्राप्त झालेले अर्ज नाकारावयाचे असल्यास तत्संबंधीच्या कारणांसह मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्वाक्षरीने संबंधित जिल्हा परिषदेस ३१ मार्च पर्यंत कळवावे.

(क)दि.१ मे रोजी सर्व जिल्हा परिषदेकडील आंतरजिल्हा बदलीचे सर्व स्तरावरील प्रलंबित / अनिर्णित प्रस्ताव निकाली निघाल्याचे समजण्यात यावे.

(८) प्रत्येक वर्षी सामावून घेणाऱ्या जिल्हा परिषदेने आंतर जिल्हा बदलीने सामावून घेण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांना दि.३१ मार्च रोजी सरळसेवेने रिक्त असलेल्या पदावर सामावून घेणे आवश्यक राहिल.

(९) पती-पत्नी एकत्रिकरणास्तव तसेच माजी सैनिक प्रवर्गातून नियुक्ती झालेल्या कर्मचाऱ्यांच्या आंतरजिल्हा बदलीच्याबाबतीत सदर अट ५ वर्षाऐवजी किमान ३ वर्षे सेवेची राहील.

(१०) शासन परिपत्रक ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र.जिपब २६००/प्र.क.६९४०/१४ दि.२९ मार्च, २००१ नुसार पती-पत्नी एकत्रिकरण हे शासनाचे धोरण आहे. या धोरणास अनुसरुन पती-पत्नी एकत्रिकरणास्तव आंतरजिल्हा बदली करताना, त्या खालील प्राधान्यक्रमानुसार करण्यात याव्यात.

१) पती-पत्नी दोघेही जिल्हा परिषद कर्मचारी असतील तर,

२) पती-पत्नी दोघांपैकी एक जिल्हा परिषद कर्मचारी व दुसरा राज्य शासकीय कर्मचारी असेल तर,

३) पती-पत्नी दोघांपैकी एक जिल्हा परिषद कर्मचारी व दुसरा केंद्र शासकीय कर्मचारी असेल तर,

४) पती-पत्नी दोघांपैकी एक जिल्हा परिषद कर्मचारी व दुसरा राज्य शासनाच्या स्वायत्त संस्थेचा कर्मचारी असेल तर(उदा.महानगरपालिका, नगरपालिका इ.),

५) पती-पत्नी दोघांपैकी एक जिल्हा परिषद कर्मचारी व दुसरा राज्य अथवा केंद्र शासनाच्या सार्वजनिक उपक्रमातील कर्मचारी,

६) पती-पत्नी दोघांपैकी एक जिल्हा परिषद कर्मचारी व दुसरा शासन मान्यता प्राप्त संस्थेतील कर्मचारी असेल तर,

७) पती-पत्नी दोघांपैकी एक जिल्हा परिषद कर्मचारी व दुसरा खाजगी संस्थेतील कर्मचारी असेल तर,

(११) बदलीसाठी विनंती करणाऱ्या व विहीत अटी पूर्ण करणाऱ्या कर्मचा-यांना आंतरजिल्हा बदलीसाठी खालील प्राधान्यक्रमानुसार सामावून घेण्यात यावे.

(अ) अपंग कर्मचारी.

(ब) गंभीर आजाराने आजारी असल्याबाबत योग्य पुरावा सादर केलेले कर्मचारी.

(क) विधवा कर्मचारी.
(ड) परित्यक्त्या कर्मचारी.
(इ) कुमारिका कर्मचारी.
(ई) सैनिक पत्नी
(उ) पती-पत्नी एकत्रिकरण
(ऊ) माजी सैनिक
(ए) उर्वरित सर्व कर्मचारी.

वरिल पैकी क्र. "अ" ते "ऊ" या प्राधान्यक्रमानुसार पात्र कर्मचाऱ्यांच्या आंतर जिल्हा बदल्या करतांना त्या त्या प्रवर्गाअंतर्गत सेवाज्येष्ठतेचा निकष लावुन त्यानुसार कार्यमुक्त करावे. क्र. "अ" ते "ऊ" च्या बदल्या केल्यानंतरच क्र. "ए" च्या बदल्या कराव्यात. यासाठी देखिल सेवाज्येष्ठता क्रमानुसार बदल्यांना व कार्यमुक्त करण्यास संमती देण्यात यावी. मात्र कार्यमुक्त करतांना सामावून घेण्याऱ्या जिल्हा परिषद व ज्या सामाजिक आरक्षणाची जागा कळविली असेल त्यानुसार वरील प्राधान्याची सांगड घालावी.

(१२) संबंधित कर्मचाऱ्याविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित अथवा चालू असल्यास सदर कर्मचारी आंतरजिल्हा बदलीस अपात्र समजण्यात यावा.

(१३) कर्मचारी कार्यरत असलेल्या जिल्हा परिषदेने सोबतच्या विवरणपत्र अ मध्ये माहिती भरुन बदलीच्या जिल्हा परिषदेकेडे पाठवावी.

(१४) जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) नियम, १९६७ च्या नियम ६ (८) मधील तरतुदींचे पालन करुनच आंतरजिल्हा बदल्या कराव्यात. तसेच शिक्षक, ग्रामसेवक आणि आरोग्य कर्मचारी या संवर्गातील कर्मचाऱ्यास आंतरजिल्हा बदलीने सामावून घेतेवेळी त्याची थेट नेमणूक अनुक्रमे शाळा, ग्रामपंचायत आणि प्राथमिक आरोग्य केंद्रावर करण्यात यावी.

(१५) आंतर जिल्हा बदलीने अन्य जिल्हा परिषदेतुन सामावून घेतलेल्या कर्मचाऱ्याची सेवाज्येष्ठता, अशा बदलीनंतर जिल्हा परिषदेत हजर झाल्याच्या दिनांकानुसार निश्चित करण्यात यावी. या बाबीचा स्पष्ट उल्लेख आंतरजिल्हा बदलीच्या आदेशात करण्यात यावा.

(१६) कर्मचाऱ्यांची नियुक्ती ज्या आरक्षित प्रवर्गातून झाली असेल त्याच प्रवर्गाच्या सरळसेवेने भरावयाच्या रिक्त पदांवरच आंतरजिल्हा बदलीने कर्मचाऱ्यांस सामावून घेण्यात यावे.

(१७) आंतरजिल्हा बदली विनंतीनुसार बदली असल्यामुळे यासाठी कोणतेही भत्ते व पदग्रहण अवधी कर्मचाऱ्यास अनुज्ञेय होणार नाही.

(१८) तसेच आंतरजिल्हा बदलीसाठी या परिपत्रकाच्या दिनांकापासुन शासन स्तरावर कोणतेही अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. तसेच, शासन स्तरावर प्रलंबित असलेले सर्व अर्ज निकाली निघाल्याचे समजण्यात यावेत.

आंतर जिल्हा बदलीसाठी शासन स्तरावरुन अट शिथिल करण्यासंबंधात आदेश देण्यात आलेले आहेत त्या आदेशानुसार व घालुन दिलेल्या अटी व शर्तीनुसार कार्यवाही करण्यात यावी.

(१९) हे परिपत्रक निर्गमीत झाल्याच्या दिनांकापर्यंत नियुक्ती आदेश निर्गमीत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या आंतरजिल्हा बदलीस या परिपत्रकातील तरतुदींमुळे बाधा पोहचणार नाही. तसेच, उर्वरीत प्रलंबित सर्व अर्ज ज्या स्तरावर प्रलंबित आहेत, त्या स्तरावर या परिपत्रकातील निश्चित केलेल्या कालावधीत

विचारात घ्यावेत. ज्या कर्मचाऱ्यांचे सद्या कार्यरत असलेल्या जिल्हा परिषदेकडे सादर केलेले अर्ज प्रलंबित आहेत, अशा कर्मचाऱ्यांनी पुन्हा अर्ज करण्याची आवश्यकता नाही.

(२०) आंतर जिल्हा बदलीसाठी कर्मचाऱ्यांच्या काही कारणास्तव तक्रारी असल्यास अशा कर्मचाऱ्यांनी संबंधित विभागीय आयुक्त यांचेकडे तक्रारी कराव्यात. संबंधित विभागीय आयुक्तांनी मे अखेर पर्यंत तक्रारीची शहानिशा करुन निर्णय देण्यात यावा. विभागीय आयुक्त यांनी दिलेला निर्णय अंतिम असेल. आंतर जिल्हा बदलीच्या प्रक्रियेमध्ये अनियमितता झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्यात येईल.

तसेच आंतरजिल्हा बदलीसाठी शासन स्तरावर कोणतेही अर्ज स्वीकारले जाणार नाही याची जाणीव संबंधित कर्मचाऱ्यांना करुन देण्यात यावी.

याशिवाय अन्य मार्गाने दबाव आणल्यास, अशा कर्मचाऱ्याविरोधात शिस्त भंगाची कार्यवाही करण्यात येईल.

सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०११०९२९१६४१३९००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(व.दा. राठोड)
उप सचिव, महाराष्ट्र शासन,

प्रत,

१.मा.राज्यपाल यांचे सचिव,
२.मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३.मा.मंत्री (ग्रा.वि.) यांचे खाजगी सचिव,
४.मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
५. विभागीय आयुक्त (सर्व विभाग)
६. उपायुक्त (आस्थापना), विभागीय आयुक्तांचे कार्यालय (सर्व विभाग)
७. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
८. महालेखापाल (१) व (२),
९. लेखा व कोषागारे, जिल्हा परिषद (सर्व)
१०.मंत्रालयीन विभाग (सर्व),
११.जनसंपक अधिकारी, माहिती व प्रशासन (प्रसिध्दी देण्यासाठी अग्रेषित)
१२. निवड नस्ती, कार्यासन क्र. आस्था १४

# विवरणपत्र-अ

## शासन परिपत्रक, ग्राम विकास व जलसंधारण विभाग,

## क्रमांक : जिपब-०७११/प्र.क्र.११३/११/आस्था-१४, दिनांक २९ सप्टेंबर, २०११ चे सहपत्र

| | | |
|---|---|---|
| १ | कर्मचाऱ्याचे संपूर्ण नांव | |
| २ | धारण केलेल्या पदाचे नाव | |
| ३ | नोकरीचे सद्याचे ठिकाण, तालुका व जिल्हा | |
| ४ | कार्यरत जिल्हा परिषदेतील नेमणूकीचा दिनांक | |
| ५ | कार्यरत जिल्हा परिषदेतील एकूण सेवा | |
| ६ | कर्मचाऱ्याचा जातीचा प्रवर्ग | |
| ७ | कर्मचाऱ्याची नेमणूक ज्या जातीच्या प्रवर्गात झाली आहे तो जातीचा प्रवर्ग | |
| ८ | जिल्हा परिषदेमध्ये कायम अथवा अस्थायी | |
| ९ | कायम असल्यास कायम झाल्याचा दिनांक | |
| १० | आंतरजिल्हा बदलीसाठी विभाग प्रमुखाकडे अर्ज सादर केल्याचा दिनांक | |
| ११ | जिल्हा परिषदेकडे अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | |
| १२ | आंतरजिल्हा बदलीच्या अटी मान्य असल्याबाबत कर्मचाऱ्याचे संमतीपत्र प्राप्त झाले आहे किंवा कसे | |
| १३ | आंतरजिल्हा बदली मागण्याबाबतची कारणे | |
| १४ | त्या कारणांच्या पृष्ठयर्थ प्रमाणपत्रे सादर केली असल्यास त्याचा तपशिल | |
| १५ | बदलीचा प्रकार :- अ) एकतर्फी<br>ब) आपसी | |
| १६ | आपसी आंतरजिल्हा बदली असल्यास कोणासोबत आपसी बदली पाहीजे त्या कर्मचाऱ्याचे नांव, पदनाम व कार्यरत जिल्हा याचा तपशिल दयावा | |
| १७ | आंतरजिल्हा बदलीच्या प्रलंबित प्रकरणांपैकी अनुक्रमांक | |
| १८ | कर्मचाऱ्याविरुध्द विभागीय चौकशी चालू/ प्रस्तावित आहे किंवा कसे<br>(त्याबाबतचा दाखला जोडावा) | |
| १९ | आंतरजिल्हा बदलीबाबत अपवादात्मक परिस्थिती आहे किंवा कसे याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्पष्ट अभिप्राय | |

| | | |
|---|---|---|
| २० | आंतरजिल्हा बदलीने कार्यमुक्त करण्यास कार्यरत जि.प.ची सहमती आहे किंवा कसे, नसल्यास त्याची कारणे नमूद करावी | |
| २१ | कर्मचाऱ्यास कार्यमुक्त केल्यास रिक्त पदावर अन्य कर्मचाऱ्याची नियुक्ती तात्काळ केली जाईल किंवा कसे | |
| २२ | ज्या पदावरुन बदली करण्यात येणार आहे त्या संवर्गातील एकूण मंजूर पदांची संख्या | |
| २३ | मंजूर पदांपैकी किती पदे रिक्त आहेत | |
| २४ | रिक्त पदे कशा प्रकारे भरण्यात येणार आहेत | |
| २५ | कर्मचारी कार्यरत असलेला भाग आदिवासी क्षेत्रात आहे किंवा कसे | |
| २६ | कर्मचारी आंतरजिल्हा बदलीने ज्या जिल्हा परिषेकडे जाऊ इच्छितो त्या जिल्हा परिषदेचे नाव | |
| २७ | कर्मचारी आंतरजिल्हा बदलीने ज्या जिल्हा परिषदेकडे जाऊ इच्छितो ती जिल्हा परिषद सदर कर्मचाऱ्यास त्याची ज्या जातीच्या प्रवर्गातून नियुक्ती झाली आहे त्याच जातीच्या प्रवर्गात सरळसेवेन भरावयाच्या रिक्त पदावर नेमणूक देण्यास सहमत आहे किंवा कसे. | |

**स्वाक्षरी/-**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद,-----------**